# वसई-विरार शहर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग

दि.०४/०८/२०२२

## प्रेसनोट

वसई विरार शहर महानगरपालिका,मुख्यालय विरार येथील सभागृहात दि.०४ ऑगस्ट, २०२२ रोजी एकल वापर प्लास्टिक (Single use Plastic) बंदी या विषयावर कार्यशाळा तसेच घरगुती व घातक कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे याबाबत चर्चा करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेस डॉ.चारुशीला पंडित, उप-आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन, तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) चे उप-प्रादेशिक अधिकारी श्री.सतीश पडवळ साहेब, महानगरपालिका क्षेत्रातील विविध औद्योगिक संस्थांच्या असोसिएशनचे पदाधिकारी, महानगरपालिकेचे वरिष्ठ आरोग्य निरीक्षक, कनिष्ठ आरोग्य निरीक्षक तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सादरीकरण डॉ.चारुशीला पंडित, उप-आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन यांनी केले.

सदर कार्यशाळेत प्लास्टिक बंदी वरील जनजागृतीसाठी उपस्थित इंडस्ट्रीयल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना कापडी पिशव्या, स्टिकर व पॅम्प्लेटस चे वाटप करण्यात आले. सर्वांनी कापडी पिशव्यांचाच वापर करावा असे जाहीर आवाहन देखील करण्यात आले. तसेच सुका कचरा हा Recyclers मार्फत व घातक कचरा शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याबाबत देखील चर्चा करण्यात आली.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**